जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक ४ | बुधवार, ९ जुलै २०२५ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

## पुणे जिल्ह्यात १२ जुलैपासून प्रतिबंधात्मक आदेश जारी : ज्योती कदम



**पुणे, ता. ०८ :** पुणे ग्रामीण जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ११ जुलैच्या मध्यरात्रीपासून २४ जुलै २०२५ च्या रात्री १२ वाजेपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी ज्योती कदम यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) आणि (३) अंतर्गत हे आदेश जारी केले आहेत.

या आदेशांनुसार, सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींच्या जमावावर बंदी घालण्यात आली आहे. तसेच, कोणतेही शस्त्र, स्फोटक पदार्थ, दगड, काठी, तलवार, बंदूक किंवा कोणतीही शारीरिक इजा करण्यास कारणीभूत ठरू शकेल अशी वस्तू सोबत ठेवण्यास मनाई करण्यात आली आहे

कोणत्याही इसमाच्या चित्राचे प्रतिकात्मक प्रेताचे किंवा पुढाऱ्यांच्या चित्राचे, प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे, मोठ्याने अर्वाच्च घोषणा देणे, वाद्य वाजविणे आवेशपूर्ण भाषणे किंवा राज्याच्या सुरक्षिततेस बाधा आणू शकतील अशा कोणत्याही कृतीवर पूर्णतः बंदी घालण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, सभा घेणे किंवा मिरवणूक काढणे यासाठी पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षकांची पूर्वपरवानगी आवश्यक राहणार आहे.

या आदेशाची अंमलबजावणी दरम्यान काही अपवादही ठेवण्यात आले आहेत. शासन सेवेत असलेल्या व्यक्ती आणि ज्यांना अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार शस्त्र बाळगण्याची अधिकृत परवानगी आहे, त्यांना या आदेशातून सूट देण्यात आली आहे.

दरम्यान, जर कोणी या आदेशाचे उल्लंघन करताना आढळले, तर संबंधित व्यक्तीवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम,१९५१ चे कलम १३५ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जिल्हा प्रशासनाच्या या निर्णयामुळे आगामी काही दिवस पुणे ग्रामीणमध्ये कडक शिस्तीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# हवेली मोजणी कार्यालयाने पुर्व दिशेला असलेली शेतजमीन दाखवली पश्चिम दिशेला

## ‘सेटलमेंट’ कारभारामुळे शेतकरी महिला अडचणीत

**संदीप बोडके**

पुणे, ता. ८: बलाढ्य कंपनीच्या दबावाला बळी पडून हवेली भूमि अभिलेख कार्यालयाने शेतकरी महिलेची पुर्व दिशेला असलेली शेतजमीन चक्क पश्चिम दिशेला दाखविल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मोजणी कार्यालयाच्या या ‘सेटलमेंट’ कारभारामुळे संबंधित महिला अडचणीत आली असून त्या मानसिक दबावाखाली आहेत.

मौजे थेऊर (ता. हवेली) येथील गट नबंर १२२ मध्ये (थेऊर-नायगाव शिव रस्ता) हा प्रकार घडला आहे. योहान पुनावाला, दी पुना स्टड फार्म लि. सायझा ग्रो ड स्टड फार्म्स एल. एल. पी. आणि जयश्री पवार यांची या गटात जमीन आहे. या गटाबाबत अतिअतितातडी हद्दकायम १२४९८/२०२४ व अतिअतितातडी हद्दकायम वहिवाटीची १३३६०/२०२४ अशा दोन मोजण्या झालेल्या आहेत. या मोजणीच्या प्रकरणात गटातील सहधारकाची अर्जावर कोठेही सही नसताना, तसेच लगतधारकांना खोट्या पत्त्यावर नोटीस पाठवून हा प्रकार परस्पर केल्याचे समोर आले आहे.

हद्दकायम मोजणीच्या हद्दी खुणा दाखवल्याची तारीख १२ सप्टेंबर २०२४ व वहिवाटीच्या मोजणीच्या हद्दी खुणा दाखवल्याची तारीख १६ डिसेंबर २०२४ आहे. म्हणजेच तीन महिन्याच्या कालावधीत दोन्ही मोजणीच्या हद्दी खुणा अंतिम केलेल्या आहेत. गटातील सहधारक जयश्री पवार यांची ४२ गुंठे जमीन गटाच्या पुर्व दिशेला म्हणजेच थेऊर-नायगाव शिव रस्ता लगत असून त्यांची वहीवाट देखील तशीच आहे. असे असतानाही त्यांची जमीन गटाच्या पश्चिम दिशेला दाखवण्याचा अजब उद्योग मोजणी कार्यालयाने केला आहे. त्यामुळे हवेली मोजणी कार्यालयातील क प्रत नकाशाचा आणखी एक गैरप्रकार समोर आला आहे.




**मोजणी कार्यालयाच्या दफ्तरांमधून अनेक गैरप्रकार समोर**

हवेली मोजणी कार्यालयाच्या दफ्तरांमधून अनेक नवीन कारनाम्यांचे किस्से बाहेर येत आहेत. हवेलीचे तत्कालीन उपअधिक्षक व भूकरमापक यांच्यावर खातरजमा न करता चुकीच्या मोजणीची क प्रत दिल्याने येरवडा पोलिस ठाण्यात नुकताच गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणाचा धुरळा खाली बसण्याच्या आतच एका शेतकरी महिलेची जमीन त्याच गटात दुसऱ्या दिशेला दाखविल्याचा धक्कादायक प्रकार हवेलीच्या मोजणी कार्यालयाने केल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणात सहधारक शेतकऱ्याला कोणतीही नोटीस बजावली गेली नाही. तसेच लगतधारक शेतकऱ्यांना चुकीच्या पत्त्यावर नोटीस पाठवली गेल्याचे उघड झाले आहे.

**काय कारवाई होणार?**

सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळविण्यासाठी हवेली भूमि अभिलेख कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागतात. तरीही त्यांना विलंबाच्या यादीत ठेवले जाते. मात्र, हवेली भूमि अभिलेख कार्यालयाने थेऊर (ता. हवेली) येथील गट क्र. १२२ च्या दोन्ही क प्रती वेगवेगळ्या दिल्या आहेत. तसेच शेतकरी महिलेची फसवणूक करून दुसऱ्या दिशेला जागा दाखवली आहे. या चुकीच्या कामामध्ये सहभागी असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर भूमि अभिलेखचे उपसंचालक व जिल्हा अधीक्षक काय कारवाई करणार? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

> संबंधित विषयात तक्रार अर्जाच्या अनुषंगाने सखोल तपासणी करण्यात येईल. उपलब्ध पुरावे व कागदपत्रे पाहून आवश्यकता असेल तर संबधितांना सुनावणीची नोटीस बजावण्यात येईल. न्याय प्रणालीच्या गुणवत्तेनुसार प्रस्तुतच्या प्रकरणात योग्य ते आदेश पारीत केले जातील.
> - **विकास गोफणे,** उपअधीक्षक, भूमि अभिलेख हवेली

## न्हावरे परिसरात ‘पीएमपीएल’ च्या बस फेऱ्या कमी; विद्यार्थी व प्रवाशांचे हाल

**योगेश मारणे**

न्हावरे, ता. ०८ : पुणे ते न्हावरे (ता. शिरूर) दरम्यान धावणाऱ्या पीएमपीएमएल (पीएमटी) बस फेऱ्यांची संख्या प्रशासनाने कोणतीही पूर्वसूचना न देता अचानकपणे मोठ्या प्रमाणात कमी केल्याने स्थानिक विद्यार्थी, नोकरदार, व्यापारी आणि इतर प्रवाशांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.




मागील दोन वर्षांपासून पुणे-वाघोली-शिक्रापूर-तळेगाव ढमढेरे मार्गे न्हावरे येथे नियमित बस सेवा सुरु होती. दिवसभरात पुणे ते न्हावरे पाच वेळा तर शिक्रापूरवरून देखील पाच वेळा बस सेवा उपलब्ध होती. याचा लाभ न्हावरे परिसरातील उरळगाव, निर्वी, निमोणे, गुनाट, आंधळगाव, आंबळे, दहिवडी, पारोडी या गावातील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर होत होता.

परंतु अलीकडे प्रशासनाने एकतर्फी निर्णय घेत तब्बल ८० टक्के बस फेऱ्या बंद केल्या आहेत. त्यामुळे शेकडो विद्यार्थ्यांना शाळा, कॉलेजला जाण्यासाठी आणि नोकरदार व व्यापाऱ्यांना कामासाठी पोहचण्यास मोठी अडचण निर्माण झाली आहे. अनेकांना ट्रक, पिकअप किंवा इतर खासगी वाहनांमधून जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर न्हावरेच्या सरपंच कमल कोकडे यांनी बस फेऱ्या पूर्ववत सुरू करण्याची मागणी केली आहे. बस सेवा नियमित सुरू राहणे गरजेचे आहे. प्रशासनाने अचानक निर्णय घेऊन संपूर्ण परिसराच्या दळणवळण यंत्रणेवर परिणाम केला आहे असे कोकडे यांनी सांगितले.दरम्यान बस फेऱ्या का कमी करण्यात आल्या याबाबत वाहतूक व्यवस्थापक सतीश गव्हाणे यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही. स्थानिक प्रशासनाने या मुद्द्याकडे गांभीर्याने लक्ष देत तातडीने बस सेवा पूर्ववत करावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## पुणे महापालिकेला सव्वा दोन महिन्यांतच १४०० कोटींचे उत्पन्न

**पुणे, ता. ०८ :** पुणे महापालिकेच्या मिळकत कर वसुलीला यंदाही सुरुवातीच्या टप्प्यात चांगली वसुली झाली आहे. ७ जुलैच्या संध्याकाळपर्यंत महापालिकेच्या तिजोरीत तब्बल १ हजार ४११ कोटी रुपयांचे उत्पन्न जमा झाले आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत मिळालेल्या १ हजार ४१५ कोटींच्या वसुलीच्या तुलनेत यंदाची आकडेवारी जवळपास समान आहे.



महापालिकेने यंदा १ मेपासून मिळकत कराची बिले वाटप करण्यास सुरुवात केली होती. मात्र, ४० टक्के सवलतींची नोंद न झाल्याने बिल वाटपात एक महिन्याचा विलंब झाला. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार, ३० जूनपर्यंत कर भरणाऱ्यांना ५ ते १० टक्के सवलत देण्यात आली होती. अखेरच्या दिवशी करदात्यांची मोठी गर्दी आणि ऑनलाइन प्रणालीवर ताण आल्याने सवलतीची मुदत ७ जुलैपर्यंत वाढविण्यात आली होती.

कर आकारणी विभागाचे प्रमुख अविनाश सपकाळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, आज संध्याकाळपर्यंत ७,७५१४०, मिळकतधारकांनी एकूण १ हजार ४११ कोटींचा कर भरला. रात्री १२वाजेपर्यंत ऑनलाइन व्यवहार सुरु राहणार असल्याने अंतिम रक्कम याहून अधिक होण्याची शक्यता आहे.

मागील वर्षी मिळकत करामध्ये ४० टक्के सवलतीसह समाविष्ट गावांतील कर वसुली स्थगित होती. या पार्श्वभूमीवर यंदाची कामगिरी समाधानकारक असल्याचे सपकाळ यांनी नमूद केले.

सपकाळ यांनी सांगितले की, मिळकत कर वसुली अधिक प्रभावी करण्यासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या असून नव्याने नियुक्त झालेल्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. थकबाकी वसुलीसाठी स्वतंत्र पथके तयार करण्यात येत असून, नवीन मिळकतींची नोंदणी आणि कर आकारणी न झालेल्या मिळकती शोधून त्यांच्यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

दुबार मिळकत कर प्रकरणे निकाली काढून वसुलीसाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील. महापालिकेच्या अंदाजपत्रकीय उद्दिष्टपूर्तीसाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू असून, नागरिकांनी वेळेत कर भरणा करून कारवाई टाळावी आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

## पुणे जिल्ह्यातील महामार्गावरील रस्त्याबाबत उपमुख्यमंत्री पवार यांचे गडकरी यांना पत्र

**पुणे, ता. ०८ :** पुणे-नाशिक आणि नाशिक-मुंबई राष्ट्रीय महामार्गांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून या दोन्ही मार्गांची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. वाहतुकीसाठी धोकादायक ठरत असलेल्या या रस्त्यांवर अपघातांची संख्या वाढली आहे. ही परिस्थिती लक्षात घेता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना पत्र लिहून दोन्ही महामार्गांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, पुणे-नाशिक महामार्ग हा औद्योगिक, व्यापारी आणि प्रवासी वाहतुकीच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा असून सध्या या मार्गावर अनेक ठिकाणी खोल खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. वेळेचा, इंधनाचा आणि मनस्तापाचा मोठा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. याशिवाय, या महामार्गावर नियमितपणे टोल आकारला जात असतानाही रस्त्याच्या गुणवत्तेत व सुरक्षिततेत कोणतीही सुधारणा झालेली नाही, हे दुर्दैवी आहे.

तसेच, नाशिक-मुंबई राष्ट्रीय महामार्गावरील कसारा घाट, इगतपुरी परिसरातील खराब रस्त्यांची अवस्था, खराब दर्जाचे डायव्हर्जन आणि पुलांचे अपूर्ण काम ही वाहतुकीस धोका निर्माण करणारी बाब असल्याचेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे. या मार्गावरही गंभीर अपघात घडत असून या दोन्ही महामार्गांची सखोल पाहणी करून तात्काळ दुरुस्तीचे आदेश द्यावेत, अशी विनंती त्यांनी पत्राद्वारे केली आहे.

# आज भारत बंदची घोषणा; २५ कोटींहून अधिक कर्मचाऱ्यांचा संपात सहभाग

## अत्यावश्यक सेवा देखील होणार ठप्प

**नवी दिल्ली, ता. ०८ :** देशभरातील २५ कोटींपेक्षा अधिक कामगार आज बुधवारी (ता. ०९) केंद्र सरकारच्या श्रमविषयक धोरणांच्या विरोधात भारत बंदमध्ये सहभागी होत आहेत. ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेससह (आयटक) १० प्रमुख केंद्रीय कामगार संघटनांच्या संयुक्त मंचाने या बंदचे आयोजन केले आहे.

या आंदोलनात बँकिंग, विमा, टपाल सेवा, कोळसा खाणी, औद्योगिक कामगार आणि परिवहन कर्मचारी सहभागी होणार असून, ग्रामीण भागातील शेतकरी आणि मजूर संघटनांनीही आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. बंदचा परिणाम देशभरातील विविध सेवा व्यवस्थांवर जाणवण्याची शक्यता आहे.




संघटनांच्या माहितीनुसार, बँकिंग, विमा आणि टपाल सेवा ठप्प राहतील, तसेच अनेक राज्यांतील सरकारी वाहतूक व्यवस्थाही विस्कळीत होऊ शकते. शेअर बाजार आणि सराफा बाजार मात्र नेहमीप्रमाणे सुरू राहतील, अशी माहिती आहे.

कामगारांच्या मागण्या कामगार संघटनांनी केंद्र सरकारकडे मागण्या मांडल्या आहेत. या मागण्यांमध्ये किमान वेतन, सामाजिक सुरक्षा, स्थायी रोजगार, निवृत्तिवेतन, आणि कामाचे तास यासारख्या मूलभूत बाबींचा समावेश आहे. हिंद मजदूर सभेचे हरभजन सिंग सिद्धू यांनी सांगितले की, सरकारने गेल्या १० वर्षांत एकही वार्षिक श्रम संमेलन घेतले नाही. ही सरकारची कामगारांप्रती असलेली उदासीनता दाखवते.

सरकारवर गंभीर आरोप संयुक्त मंचाचा आरोप आहे की, सरकारने अमलात आणलेल्या चार नव्या श्रम कायद्यांमुळे कामगारांच्या हक्कांवर गदा आली आहे. या कायद्यांमुळे सामूहिक करार प्रक्रियेवर मर्यादा, संघटनांच्या कार्यक्षमतेवर बंधने, आणि संपाचा अधिकार निष्प्रभ करण्याचा प्रयत्न आहे. संघटनांनी असेही म्हटले आहे की, सरकार सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे खाजगीकरण, आउटसोर्सिंग, आणि कंत्राटी कामगार पद्धतीला प्रोत्साहन देत आहे. यामुळे कामगारांचे भविष्य अंधारात जाते आणि त्यांच्या सामाजिक सुरक्षेवर गदा येते.

**आंदोलनाला शेतकरी संघटनांचा पाठिंबा**

संयुक्त किसान मोर्चा आणि कृषी कामगार संघटनांच्या मंचानेही या संपाला संपूर्ण पाठिंबा दर्शवला आहे. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर आंदोलन करण्याचेही आवाहन करण्यात आले आहे. संघटनांचे स्पष्ट मत आहे की, सरकारने केवळ भारतीय व विदेशी कॉर्पोरेट्सच्या हितासाठी काम केले असून, कामगार कल्याणाकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे हा संप म्हणजे केवळ मागण्यांचा लढा नाही, तर कामगारांच्या अस्तित्वासाठीचा संघर्ष आहे.

# केडगाव येथील सप्तवृक्ष देवस्थानच्या वतीने १६० पालख्यांना भेटी

**केडगाव, ता. ०८ :** सप्तवृक्षापासून दौंड तालुक्यातील केडगाव येथे प्रचलित झालेले सप्त रुक्ष देवस्थान गेले दोन वर्षापासून उदयास आले आहे. या वृक्षांची जोपासना करून या ठिकाणी असलेले सेवेकरी पद्माकर देशमुख हे आध्यात्मिक क्षेत्रामध्ये प्रगती व्हावी व त्याचा प्रचार, प्रसार व्हावा यासाठी त्यांनी श्री दत्त महाराज व सिताराम मामा यांच्या चांदीच्या पादुका त्या ठिकाणी ठेवण्यात आले आहे.



तसेच दोन वर्षापासून सेवेकरी देशमुख हे आषाढी महावारीला या दत्तांच्या पादुका घेऊन जात असतात. आतापर्यंत २९५ पालख्याना त्यांनी या दत्तांच्या पादुकांची भेट घडवून आणली आहे. यादरम्यान ते पालखीच्या प्रमुखांना शाल, श्रीफळ व देणगी स्वरूपात रोख मदत करत असतात, त्यांनी मागील वर्षी १३५ पालख्याना व यावर्षी १६० पालख्याना भेटी देऊन अध्यात्मिक व संप्रदाय क्षेत्राचा प्रचार व प्रसार केला आहे.

दरम्यान, सेवेकरी देशमुख म्हणाले, सुख शोधण्यासाठी कुठेही न जाता आत्मिक सुख शोधायचे असेल तर सर्वांनी सत्याचा मार्ग अवलंबून यामध्ये आपण सर्वच परी उतरावे, त्यांनी पुढे जाऊन असे सांगितले की, पुढील वर्षी आमच्या वतीने ज्या पालख्याना भेट दिली जाईल व तेथील भाविक भक्तांना आम्ही मोठ्या स्वरूपात अन्नदान करणार आहोत असेही देशमुख यांनी सांगितले.

# पोलिस कर्मचाऱ्याने ७३ तोळे सोने आणि १७ लाख रुपये लुबाडले

**पुणे, ता. ०८ :** पुणे पोलिस दलात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पोलीस खात्यातील कर्मचारी गणेश अशोक जगताप याच्याविरोधात ५१ वर्षीय महिलेने फसवणुकीची तक्रार दाखल केल्यानंतर पोलिस दलात एकच खळबळ उडाली आहे. पोलिसाची वर्दी घालून जनतेच्या सेवेसाठी नेमलेला अधिकारीच गुन्हेगारीच्या दलदलीत असल्याचे स्पष्ट झाल्याने खाकीला डाग लागल्याची भावना व्यक्त होत आहे.

तक्रारदार महिलेसह तिच्या पतीची ओळख असल्याचा गैरफायदा घेत जगताप यांनी मी पोलीस खात्यात असल्यामुळे बँकेतून कर्ज मिळत नाही. माझ्याकडे ५ किलो सोने आहे, जे गहाण ठेवले आहे. लवकरच माझे प्रॉपर्टी डीलिंग पूर्ण होणार असून त्यातून सर्व पैसे आणि दागिने परत करीन, अशा आश्वासनाच्या आधारे तब्बल ७३.५ तोळे सोने व रोख रक्कम आणि धनादेश स्वरूपात १७ लाख रुपये घेतले.

यामध्ये २४.६ तोळे सोने त्यांनी ऑक्टोबर २०१९ रोजी, तर ४८.९ तोळे सोने जानेवारी रोजी घेतल्याचे तक्रारीत नमूद आहे. यासोबतच फिर्यादीच्या पती व मुलाकडून वेळोवेळी रोख रक्कमही घेतली गेली. मात्र, सांगितल्याप्रमाणे पैसे व दागिने परत न दिल्यामुळे महिलेला आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले आणि तिने चतु:शृंगी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

२१ ऑगस्ट २०२४ रोजी जगताप यांची बदली पोलिस



मुख्यालयातील विशेष शाखेत झाली होती. मात्र, ते तिथे हजर न राहता त्यांनी औंधमधील एका सराफी व्यावसायिकाला गंडवले. पोलिस दलातील माजी वरिष्ठ अधिकाऱ्याचे नाव वापरून त्यांनी सुमारे लाख हजार रुपयांचे दागिने घेतले. जेव्हा सराफी व्यावसायिकाने पैसे मागितले, तेव्हा जगताप यांनी त्याला ठार मारण्याची धमकी दिली. त्यामुळे त्यावेळी तत्कालीन पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी त्यांचे निलंबन केले होते.

**राष्ट्रपती पदकासाठी बनावट कागदपत्रांची निर्मिती**

गणेश जगताप यांनी मध्ये राष्ट्रपती पदक मिळवण्यासाठी देखील बनावट सेवा नोंदी तयार करत सरकारची फसवणूक केली होती. या प्रकरणात वानवडी पोलीस ठाण्यात जगताप आणि दोन लिपिकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यांनी सेवा पुस्तकात खोटी नोंद केली, बनावट दस्त तयार केला आणि त्यावर खोट्या सह्या व शिक्के मारत शासकीय नोंदी नष्ट केल्या. या प्रकरणामुळे पोलिस दलातील नियमावली आणि पारदर्शकतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

**कायदा रक्षकच बनला भक्षक?**

या प्रकारांमुळे नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर संताप व्यक्त होत असून, कायदा रक्षकच जर गुन्हेगार ठरत असेल, तर सामान्य माणसाचा न्यायावरचा विश्वास डळमळीत होण्याचा धोका निर्माण झाला आहे. पुणे पोलिस दलाने या प्रकरणी कडक पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, या सर्व प्रकारांमुळे पोलीस खात्याची प्रतिमा मळवली गेली असून, आरोपी गणेश जगताप याच्यावर कठोर कारवाईची मागणी आता जोर धरू लागली आहे.

# शिरूर तालुक्यात पुन्हा डाळिंब चोरीचा प्रयत्न ; सतर्कतेमुळे चोरांचे दुचाकी सोडून पलायन

ओमकार भोरडे

शिरूर, ता. ०८ : शिरूर तालुक्यातील मोटेवाडी येथे मंगळवारी पहाटेच्या सुमारास डाळिंब चोरीचा प्रयत्न उधळण्यात शेतकऱ्याला यश आले. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, चोरट्यांनी आपली दुचाकी घटनास्थळीच सोडून पलायन केले.



याआधी शिरूर तालुक्यातील उरळगाव व शिंदोडी येथील डाळींब बागेतून सहा लाखांचे डाळिंब चोरट्यांनी चोरून नेले होते. याबाबत पोलिस तपास करत असताना पुन्हा आज पहाटे मोटेवाडी येथे डाळींब चोरीचा प्रकार शेतकऱ्याच्या जागरूकतेमुळे 'सला असला तरी चोरट्यांची मोटारसायकल मात्र सापडली आहे.

शिरूर तालुक्यातील मोटेवाडी येथील शेतकरी संदीप येलभर हे पहाटेच्या वेळी शेतात गस्त घालत होते. त्यावेळी काही अनोळखी व्यक्ती त्यांच्या डाळिंब बागेत संशयास्पद हालचाली करत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. शंका येताच येलभर यांनी आरडा-ओरडा केला, त्यावेळी घाबरून चोरट्यांनी घटनास्थळीच आपली दुचाकी सोडून पळ काढला.

येलभर यांनी तत्काळ ११२ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधून पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच शिरूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली व प्राथमिक तपास सुरू केला. घटनास्थळी सापडलेली दुचाकी पोलिसांनी ताब्यात घेतली असून, त्यावरून चोरट्यांची ओळख पटवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

दरम्यान, या घटनेनंतर परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. डाळिंब, द्राक्ष, केळी आदी 'ळबागांमध्ये चोरीच्या घटना वाढत असल्याने शेतकऱ्यांनी सुरक्षेच्या दृष्टीने शेतात सीसीटीव्ही, हायमास्ट लाईट्स यांसारखी साधने बसवावीत, असा सल्ला पोलिसांकडून दिला जात आहे.याबाबत पुढील तपास पोलिस करत असून, लवकरच चोरट्यांना अटक केली जाईल, असा विश्वास पोलीस प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# हिंजवडीसह सात गावे पिंपरी-चिंचवड पालिकेत घ्या; मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडून कार्यवाहीचे आश्वासन

**पुणे, ता. ०८ :** पिंपरी-चिंचवड शहरालगत असलेल्या मुळाशी व मावळ तालुक्यातील हिंजवडी, माण, मारुंजी, नेरे, जांबे, सांगवडे आणि गहुंजे या सात गावांचा समावेश महापालिका हद्दीत करून नियोजनबद्ध आणि शाश्वत विकास साधावा, अशी मागणी चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे अधिकृत निवेदनाद्वारे केली.



या मागणीची तात्काळ दखल घेत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांना त्वरेने कार्यवाहीचे आदेश दिले आहेत. या निवेदनादरम्यान खासदार श्रीरंग बारणे हेही उपस्थित होते. यावेळी स्थानिक कार्यकर्ते, ग्रामस्थ तसेच मोठ्या संख्येने आयटी व्यावसायिक सहभागी होते. महापालिकेने २०१८ साली या सात गावांचा समावेश करण्याचा ठराव करून राज्य शासनाकडे सुधारित प्रस्ताव पाठवला होता. मात्र अद्याप त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही.

**मागणी मागील प्रमुख कारणे**

१) राजीव गांधी आयटी पार्क व इतर औद्योगिक प्रकल्पांमुळे झपाट्याने नागरीकरण
२) दोन लाखांहून अधिक तरंगती लोकसंख्या
३) रस्ते, पाणी, ड्रेनेज, आरोग्य, कचरा व्यवस्थापन, वाहतूक यंत्रणेवर वाढता ताण
४) विविध शासकीय यंत्रणांमध्ये समन्वयाचा अभाव आणि त्यामुळे रखडलेली विकासकामे

**समावेश झाल्यास संभाव्य फायदे**

१. एकसंध नागरी प्रशासनामुळे नियोजनबद्ध व जलद विकास
२. वाहतूक आणि पायाभूत सुविधा प्रश्नांवर प्रभावी उपाय
३. नागरिकांना मुलभूत सेवा एकाच यंत्रणेद्वारे मिळण्याची हमी
४. उद्योग व आयटी क्षेत्राला अधिक सहकार्य
५. शासनाच्या महसुलात वाढ


दरम्यान, या भागांचा विकास ग्रामपंचायतीच्या क्षमतेबाहेर गेला आहे. नागरिकांना आवश्यक नागरी सुविधा पुरवण्यासाठी आणि नियोजनबद्ध नागरीकरणासाठी या गावांचा चिंचवड महापालिकेत समावेश होणे अत्यावश्यक असल्याचे आमदार जगताप म्हणाले.






संक्षिप्त

## पुणे पर्यटनावर जिल्हाधिकाऱ्यांचा मोठा निर्णय



**पुणे, ता. ०८ :** पावसाळ्यात निसर्ग अधिकच खुलतो आणि अशा काळात धबधबे, धरणे, गडकिल्ले यांसारख्या ठिकाणी पर्यटकांची मोठी गर्दी होते. मात्र, या गर्दीमुळे अपघाताची शक्यता वाढते. त्यामुळे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. या बैठकीत प्रत्येक पर्यटनस्थळी एकावेळी किती पर्यटकांना प्रवेश द्यायचा, याची संख्या निश्चित करण्याचे आदेश देण्यात आले. ही अंमलबजावणी वन विभाग आणि स्थानिक प्रशासन मिळून करणार आहेत.काही दिवसांपूर्वी कुंडमाळा पुलावर मोठी दुर्घटना घडली होती. पुलावर एकाच वेळी अनेक पर्यटक जमा झाल्यामुळे पूल झुकला आणि काहीजण नदीत पडले. या घटनेत चार जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर जिल्ह्यातील पर्यटनस्थळांवरील सुरक्षेच्या उपाययोजनांकडे गांभीर्याने पाहिले जात आहे. पर्यटनस्थळी प्रवेश मर्यादेबरोबरच, निश्चित शुल्क आकारणे, क्षेत्राचे सीमांकन, बॅरिकेट्सची व्यवस्था, आणि सुरक्षित जागा निश्चित केली जाणार आहे. तसेच, सुरक्षा रक्षकांची नेमणूक केली जाणार आहे. दरम्यान, वन विभागाकडे पुरेशा सुरक्षा रक्षकांची संख्या नसल्यामुळे स्थानिक नागरिकांना पर्यटक मित्र म्हणून नेमण्यात येणार आहे. हे पर्यटक मित्र पर्यटकांना मार्गदर्शन करतील आणि सुरक्षिततेची जबाबदारी घेतील. त्यांना पर्यटन शुल्कातून मिळालेल्या निधीतून मानधन दिले जाईल, अशी माहिती जिल्हाधिकारी डुडी यांनी दिली.

# मंत्री प्रताप सरनाईकांसमोर 'जय गुजरात' अन् ५० खोकेच्या घोषणा

**ठाणे, ता. ०८ :** मीरा भाईंदरमध्ये मराठी अस्मितेच्या मुद्द्यावरून पुकारण्यात आलेल्या मोर्चाला आज विराट स्वरूप प्राप्त झाले. मराठी एकीकरण समितीने दिलेल्या हाकेवर महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना (उबाठा गट) यांनी जोरदार पाठिंबा दिला. दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या सहभागामुळे मोर्चामध्ये मोठी ऊर्जा दिसून आली. मात्र, याच मोर्चात मंत्री प्रताप सरनाईक यांना आंदोलकांनी जोरदार विरोध करत त्यांची बोचरी शब्दांत पाठवणी केली.



प्रताप सरनाईक मी आधी मराठी, नंतर मंत्रीअशा घोषणा देत मोर्चात सहभागी झाले होते. त्यांनी मी मराठीअसा संदेश देणारी गांधी टोपीही परिधान केली होती. मात्र, मोर्चेकरांनी त्यांना ओळखताच जय गुजरात, ५० खोके एकदम ओकेअशा घोषणा देत तीव्र निषेध नोंदवला. यावेळी सरनाईक यांचा एक जुना व्हिडिओ देखील सोशल मीडियावर व्हायरल झाला, ज्यामध्ये ते म्हणताना दिसतात, मी जेव्हा मीरा भाईंदरच्या हद्दीत प्रवेश करतो, तेव्हा माझ्या तोंडून हिंदीच निघते. त्यामुळे त्यांचा मराठी अस्मितेच्या मुद्द्यावरचा सहभाग ढोंगी वाटल्याने आंदोलक संतप्त झाले आणि सरनाईक मोर्चातून निघून गेले.मोर्चाला बालाजी हॉटेलपासून सुरुवात होणार होती. मात्र, त्याआधीच पोलिसांनी मनसे नेते अविनाश जाधव यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. काही कार्यकर्त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले होते. शिवसेनेचे काही स्थानिक नेतेही स्थानबद्ध करण्यात आले होते. यामुळे वातावरण तणावपूर्ण झाले होते. दरम्यान, पोलीस अधिकाऱ्यांनी सुरुवातीला मोर्चासाठी परवानगी नाकारली होती. मात्र, मराठी एकीकरण समितीने पुढाकार घेत शिवसेना व मनसेच्या कार्यकर्त्यांसह मोर्चा काढला आणि अखेर पोलिसांनी ठराविक मार्गाने मोर्चा काढण्यास परवानगी दिली. या दरम्यान पोलिसांनी अविनाश जाधव यांचीही सुटका केली. फडणवीसांचे स्पष्टीकरण गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मोर्चाला परवानगी नाकारण्यामागचं कारण स्पष्ट केलं. मनसेकडून जाणीवपूर्वक संघर्ष होईल असा रूट मागितला जात होता. पोलिसांनी त्याऐवजी नेहमीचा रूट घ्यावा असा आग्रह धरला. मात्र, मनसेने आपला ठरवलेला मार्ग सोडण्यास नकार दिल्यामुळे परवानगी नाकारली, असे फडणवीस म्हणाले.

## आमदार सुरेश धसांच्या मुलाच्या कारची दुचाकीला धडक

**बीड, ता. ०८ :** आष्टी मतदारसंघाचे भाजपचे आमदार सुरेश धस यांचा मुलगा सागर धस याच्या कारने दुचाकीस्वाराला दिलेल्या धडकेत एका दुचाकीस्वाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सोमवारी रात्री साडेदहाच्या सुमारास पुणे-अहिल्यानगर महामार्गावर जातेगाव फाट्यानजीक घडली. मृत व्यक्तीची ओळख नितीन शेळके असे असून, तो त्या परिसरातील रहिवासी होता.

प्राथमिक माहितीनुसार, सागर धस सोमवारी रात्री आपल्या चारचाकी वाहनातून पुण्याकडे जात होता. दरम्यान, जातेगाव फाट्याजवळून एक दुचाकीस्वार रस्ता ओलांडत असताना सागरच्या वाहनाने त्याला जोरात धडक दिली. धडक इतकी जबरदस्त होती की नितीन शेळके काही मीटर दूर फेकला गेला. घटनेनंतर स्थानिकांनी आणि अपघातस्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी तातडीने गंभीर जखमी अवस्थेत



नितीनला रुग्णालयात दाखल केलं. मात्र, डॉक्टरांनी त्याला दाखल केल्यानंतर मृत घोषित केले.

दरम्यान, रस्त्यावर रक्ताचे डाग आणि दुचाकीचा चक्काचूर झालेला अवस्थेतील अवशेष पाहून अनेकांनी धसकाच घेतला. घटनेनंतर सागर धस काही वेळ घटनास्थळी थांबला होता, मात्र पोलीस घटनास्थळी आल्यानंतर अपघाताचा पंचनामा करण्यात आला. या संपूर्ण प्रकरणी सुपा पोलीस स्टेशनमध्ये अपघाताचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# पुणे बाजार समितीच्या सभापतीपदी कोणाची वर्णी लागणार

**पुणे, ता. ०८ :** पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदाचा दिलीप काळभोर यांनी राजीनामा दिल्यानंतर कोणाची वर्णी लागणार याकडे जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे. इच्छुकांमध्ये माजी सभापती आणि ज्येष्ठ संचालक प्रकाश जगताप, रोहिदास उंद्रे, राजाराम कांचन आणि रामकृष्ण सातव हे तीव्र इच्छुक असल्याची चर्चा आहे. त्यामुळे सभापतिपदाची निवडणूक ही बिनविरोध होणार की चुरशीची, हे पाहणे देखील औत्सुक्याचे ठरणार




आहे. २५ महिन्यांपूर्वी पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक झाल्यानंतर सभापतिपदी काळभोर यांची निवड झाली. त्यानंतर सव्वा वर्षाच्या कालावधीत अविश्वास ठराव दाखल केला होता. राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी तर थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे बाजार समिती बरखास्त करण्याची मागणी केली होती. तर, वडगावशेरीचे आमदार बापू पठारे यांनी बाजार समिती विषयी अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला होता.

तर २०२३ मध्ये तत्कालीन पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनीही संचालक मंडळाच्या कारभाराच्या चौकशीचे आदेश दिले होते. ती चौकशी अद्याप पूर्ण झालेली नाही. यापूर्वी सभापतींवर एकदा अविश्वासाचा ठरावही आणण्यात आला होता. मात्र, तो फेटाळण्यात आला. त्यानंतर त्यांनी आता राजीनामा दिला आहे. दरम्यान, बाजार समितीवर २० वर्षे प्रशासक होते. त्यानंतर २५ महिन्यांपूर्वी निवडणूक झाली. त्यानंतर संचालक मंडळ आले. तेव्हापासून काळभोर सभापती होते. बाजार समितीवर विजयी झालेले संचालक मंडळ राष्ट्रवादी, भाजपसह विविध पक्षाने स्थानिक आमदार आणि संमिश्र आहे.

# राज्यात लवकरच निवडणुकांचे बिगुल वाजणार; निवडणूक आयोगाने बोलावली जिल्हाधिकाऱ्यांची बैठक

**मुंबई, ता. ८ :** एकीकडे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राजकीय पक्षांनी मोर्चे बांधणी सुरू केली असून, आता राज्य निवडणूक आयोगातर्फे देखील तयारी सुरु झाली आहे. आयोगाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवत महत्वाची बैठक आयोजित केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०२५ हा या बैठकीचा विषय असून १० जुलै रोजी दुपारी १२ वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे ही बैठक पार पडणार आहे.

या बैठकीत मुंबई शहर व मुंबई




उपनगर जिल्हा वगळून राज्यातील इतर सर्व जिल्ह्यातील निवडणूक पूर्व परिस्थितीचा आढावा या बैठकीत घेतला जाणार आहे. त्याअनुशंगाने जिल्हाधिकाऱ्यांना बैठकीसाठी काय तयारी करायची आहे व काय माहिती घेऊन बैठकीला हजर राहायचे याबाबत या पत्रात सांगण्यात आलं आहे.

राज्यातील ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्या, २४८ नगरपरिषदा, ४२ नगरपंचायती व २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका आगामी काळात घेण्यात येणार आहेत. या निवडणुकांचा (महानगरपालिका वगळून) पूर्वतयारीचा विभागनिहाय आढावा राज्य निवडणूक आयुक्त व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे घेणार आहेत.

निवडणुका घेण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था, मतदार संख्या, मतदान केंद्र, ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (एतच), आवश्यक मनुष्यबळ, वेळेवर उपस्थित होणारे मुद्दे या विषयाची माहिती तयार करून ती आयोगास पीडीएफ फॉरमेटमध्ये ई-मेलद्वारे ९ जुलै २०२५ रोजी किंवा तत्पूर्वी सादर करण्यास सांगण्यात आले आहे. तसेच सर्व मुद्यांसंदर्भातील माहितीसह व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे होणाऱ्या बैठकीस जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्यास सांगण्यात आले आहे. राज्य निवडणूक आयोगाच्यावतीने उपायुक्त राजेंद्र पाटील यांनी याबाबतचे पत्र राज्यातील सर्व विभागीय आयुक्तांना पाठवले आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of pune prime news Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी१, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज प्रायवेट लिमिटेड, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापरचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी: ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ




# UPI होतंय आणखी स्मार्ट! आता ॲपशिवाय पेमेंट

**मुंबई :** डिजिटल पेमेंटच्या क्षेत्रात भारत आणखी एक क्रांतिकारी पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे. युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (UPI) प्रणाली लवकरच इतकी स्मार्ट होणार आहे की, वापरकर्त्यांना व्यवहारासाठी मोबाइल ॲप उघडण्याची गरजच भासणार नाही. कार, स्मार्ट टीव्ही, स्मार्टवॉच आणि अन्य उपकरणांद्वारे थेट पेमेंट करता येणार आहे.

नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI) एक स्मार्ट णझख प्रणाली विकसित करत आहे जी इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT) आधारित असेल. या प्रणालीत, प्रत्येक स्मार्ट डिव्हाइसला स्वतंत्र UPI आयडी (VP-A) दिला जाईल, जो वापरकर्त्याच्या मूळ UPI आयडीशी लिंक केला जाईल.

यामुळे वापरकर्ता आपल्या स्मार्ट डिव्हाइसवरून ॲप न उघडता थेट पेमेंट करू शकेल. सुरुवातीला एकदाच OTP द्वारे डिव्हाइस लिंक करणे आवश्यक असेल.

ही प्रणाली UPI ऑटो पे आणि UPI सर्कल वैशिष्ट्यांवर आधारित असेल. याचा अर्थ, एकदाच परवानगी दिल्यानंतर उपकरणं विशिष्ट मर्यादेत आपोआप पेमेंट करू शकतील. हे विशेषतः सबस्क्रिप्शन रिन्यूअल, पार्किंग फी, तिकिट बुकिंग यांसारख्या बाबींमध्ये उपयुक्त ठरणार आहे.

बिझनेस स्टँडर्डच्या अहवालानुसार, ही प्रणाली NPCI च्या वार्षिक इनोव्हेशन योजनेचा भाग आहे. ग्लोबल फिनटेक फेस्टिव्हल (GFF) २०२५ मध्ये हे फीचर सादर होण्याची शक्यता आहे. सध्या या योजनेला नियामक संस्थांकडून मंजुरीची वाट पाहावी लागत आहे.

**काय बदलेल तुमच्यासाठी?**

१) ॲप न उघडता स्मार्टवॉचमधून पेमेंट
२) कारमधून पार्किंग फी किंवा टोलचे थेट पेमेंट
३) स्मार्ट टीव्हीद्वारे जढ्ढ सबस्क्रिप्शनचे ऑटो रिन्यूअल
४) सोप्या व जलद व्यवहारांची सुविधा, डिजिटल पेमेंट क्रांतीमध्ये ही एक नवी भर ठरणार असून, भविष्यात पेमेंटसाठी फोन हातात घ्यायची गरज पडणार नाही.

# PM-KISN योजनेचा २० वा हप्ता जुलैमध्ये अपेक्षित




मुंबई प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना (PM-KISN) अंतर्गत शेतकऱ्यांना दरवर्षी तीन हप्त्यांमध्ये ६,००० रुपये थेट त्यांच्या बँक खात्यात दिले जातात. याच योजनेचा २० वा हप्ता जुलै २०२५ च्या पहिल्या आठवड्यात जारी होण्याची शक्यता आहे. यापूर्वी १९ वा हप्ता २४ फेब्रुवारी २०२५ रोजी वितरित करण्यात आला होता.मात्र अद्याप अनेक शेतकऱ्यांचे मागील हप्ते प्रलंबित आहेत किंवा पुढील हप्ताही अडकण्याची शक्यता आहे. त्यामुळे योजनेचा लाभ वेळेत मिळावा यासाठी खालील चार महत्त्वाची कामे तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहे.

PM-KISN योजनेचा लाभ घेण्यासाठी ई-केवायसी आवश्यक आहे. शेतकरी pmkisan.gov.in(http://pmkisan.gov.in) या अधिकृत वेबसाइटवर जाऊन स्वहस्ते e-KYC करू शकतात, किंवा जवळच्या कॉमन सर्व्हिस सेंटर (CSC) वर जाऊन बायोमेट्रिक पद्धतीने प्रक्रिया पूर्ण करता येते. ई-केवायसी न केल्यास हप्ता रोखला जाऊ शकतो.

शेतजमिनीची पडताळणी : शेतकऱ्यांच्या नावावर असलेली शेती भूसंपत्ती नोंदणी व पडताळणी प्रणालीमध्ये अचूक नोंदलेली असणे गरजेचे आहे. जमीन रेकॉर्डमध्ये चूक असल्यास तहसील कार्यालयात तात्काळ दुरुस्ती करून घ्यावी.

आधार-बँक खाते लिंकिंग : शेतकऱ्याचे बँक खाते आधार क्रमांकाशी लिंक असणे बंधनकारक आहे. अन्यथा DBT द्वारे रक्कम थेट खात्यात जमा होणार नाही. बँकेत जाऊन आधार लिंकिंग फॉर्म भरून प्रक्रिया पूर्ण करावी.

मोबाईल नंबर अपडेट करा : OTP तपासणीसाठी अचूक मोबाईल क्रमांक आवश्यक आहे. चुकीचा मोबाईल नंबर असल्यास व्यवहार अडकतो. pmkisan.gov.in(http://pmkisan.gov.in) पोर्टलवर Update Mobile Number या पर्यायाद्वारे सुधारणा करता येते.

तुमचं नाव यादीत आहे का? : Beneficiary Status पर्यायाद्वारे पोर्टलवरून आपले नाव, खाते क्रमांक व हप्त्याची स्थिती तपासता येते. नाव न आल्यास ग्रामसेवक, तलाठी किंवा कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

२० वा हप्ता कधी येणार? : मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, १८ जुलै रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा बिहारमध्ये मोठा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमातच २० व्या हप्त्याचे वितरण होण्याची शक्यता आहे. हा हप्ता जूनमध्ये अपेक्षित होता, मात्र अद्याप तो रोखला गेला आहे.

कुठे संपर्क साधावा? : अधिकृत पोर्टल: www.pmkisan.gov.in(http://www.pmkisan.gov.in) टोल-फ्री हेल्पलाईन: १५५२६१ , १८००-११-५५२६ , ०११-२३३८१०९२

# लोणी काळभोर येथील गुटख्याच्या कारवाईत दीड लाखांची मांडवली?

## नागरिकांमध्ये जोरदार चर्चा, पोलिस प्रशासन संशयाच्या भोवऱ्यात

**लोणी काळभोर, ता. ०८ :** पुणे - सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरून अवैध तंबाखूजन्य पदार्थाची वाहतूक करणाऱ्या दोघांना लोणी काळभोर पोलिसांनी पकडले होते. पोलिसांनी ही कारवाई लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील बोरकर वस्ती परिसरात रविवारी (ता. ६) सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास केली होती. या कारवाई दरम्यान, कनिष्ठ पोलिस अधिकारी व त्याच्या सहकाऱ्यांनी गुन्ह्यात मांडवली करून आरोपींकडून सुमारे दीड लाख रुपये उकळल्याची जोरदार चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे. यामुळे लोणी काळभोर पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून पोलिस प्रशासन संशयाच्या भोवऱ्यात अडकले आहे.

पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरून ट्रॅव्हल्स मधून गुटखा येणार असून तो बोरकर वस्ती परिसरात देण्यात येणार आहे. अशी माहिती पोलिसांना एका खबऱ्यामार्फत मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलिसांनी सदर ठिकाणी सापळा रचला. सोलापूर कडून पुण्याच्या दिशेने चाललेली एक ट्रॅव्हल्स बस त्या परिसरात थांबली व तेथून दोघांनी चार पोती सामान उतरविले. त्यामुळे पोलिसांचा संशय अजून बळावला. पोलिसांनी दोन्ही संशयितांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडील पोत्यांची झडती घेतली असता, त्यामध्ये ९४ हजार ५०० रुपयांचा तंबाखूजन्य पदार्थ मिळून आला.

दरम्यान, लोणी काळभोर



येथील मटका किंग भाईने कारवाई टाळण्यासाठी व पकडलेला माल परत मिळवून देण्यासाठी एका कनिष्ठ अधिकाऱ्यासोबत मध्यस्थी केली. यावेळी प्रकरण दाबण्यासाठी तीन लाखांची मागणी करण्यात आली होती. परंतु, तडजोडीअंती दीड लाख रुपये देण्याची बोली जिल्हा परिषदेच्या शाळेजवळ ठरली. दोन्ही आरोपींनी नातेवाईक व मित्रपरिवाराकडून हातउसने करून पैसे घेतले. लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या एका दालनात कनिष्ठ पोलिस अधिकारी व त्याच्या बगलबच्च्यांना रक्कम दिली. कारवाई होणार नाही आणि आपला पकडलेला मालही परत मिळणार असल्याने आरोपीही खुश झाले होते.

लोणी काळभोर पोलीस ठाण्यातील एका कनिष्ठ अधिकाऱ्याने दोघांनाही रविवारी सकाळी पकडल्यानंतर रात्री अकरानंतर सोडून दिले. त्यामुळे दोघांनाही वाटले आपल्यावरची कारवाई टळली आहे. मात्र दोन्ही आरोपींवर भारतीय न्याय संहीता कलम २२३, २७४,२०५, अन्न सुरक्षा मानकेअधिनियम २००६ चे कलम ३० (२) (अ), ३१ (१), २६(२) (१) २६(२) (खत) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मग कारवाई न करण्यासाठी घेतलेले पैसे गेले कोठे? असा सवाल या ठिकाणी उपस्थित झाला असून या प्रकरणाची नागरिकांमध्ये दबक्या आवाजात चर्चा सुरु आहे.

लोणी काळभोर पोलिस ठाण्याच्या हद्दीत खुलेआम गुटखा विक्री सुरू आहे. तर शाळा, महाविद्यालये, दवाखान्यासह चौकाचौकात पान टपरीवर नशेली पानांची जोरदार विक्री सुरू आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. मात्र पोलिस प्रशासन अवैध गुटखा विक्रीवर कारवाईचा बडगा उगारीत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे लोणी काळभोर पोलिसांच्या कार्यविवरणावर संशय निर्माण झाला आहे. तर संबंधित कनिष्ठ पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांवर पोलीस आयुक्त अमितेश कुमार काय कारवाई करणार? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# 'पिंपरी-चिंचवड प्रारुप विकास आराखड्याबाबत कोणत्याही भूमिपुत्रावर अन्याय होणार नाही

**पिंपरी-चिंचवड, ता. ०८ :** शहराच्या प्रारुप विकास आराखड्याची अंतीम रूपरेषा ठरवताना कोणत्याही भूमिपुत्रावर अन्याय होणार नाही, गोरगरिबांची घरे बाधित होणार नाहीत आणि देवस्थानांच्या जमिनींवरील आरक्षणांची चौकशी करून आवश्यक ती आरक्षणे रद्द केली जातील, असे आश्वासन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत दिले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि नगर रचना विभागाने १५ मे २०२५ रोजी शहराचा प्रारुप विकास आराखडा (डीपी) प्रसिद्ध केला आहे. या आराखड्यावर हरकती व सूचना १४ जुलै २०२५ पर्यंत मांडता येणार आहेत. या पार्श्वभूमीवर भाजपचे आमदार महेश लांडगे आणि आमदार शंकर जगताप यांनी लक्षवेधी सूचना सभागृहात मांडल्या.

आमदार शंकर जगताप यांनी आराखड्यात बांधकाम परवाने घेतलेल्या जमिनींवर चुकीच्या पद्धतीने आरक्षण टाकल्याचा आरोप केला. त्यांनी नमूद केले की, पुनावळे येथील कचरा डेपोचे आरक्षण रद्द करून त्या ठिकाणी व्यावसायिक संकुलाचे आरक्षण केले गेले. एचसीएमटीआर मार्गातील साडेतीन किलोमीटरवर लिनिअर गार्डन प्रस्तावित असूनही आराखड्यात त्याचा विचार करण्यात आलेला नाही. थेरगाव भागातील हजारो रहिवाशांना बेघर होण्याची भीती आहे. अधिकाऱ्यांनी मंत्री यांना चुकीची माहिती दिल्यामुळे त्यांचे उत्तर अस्पष्ट झाले, अशी टीकाही त्यांनी केली.

आमदार महेश लांडगे यांनी सांगितले की, प्रारुप आराखड्यात जुन्या डीपीतील ८५० आरक्षणे नव्याने प्रस्तावित करण्यात आली आहेत. ही आरक्षणे ठरवताना प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करावी. मोशी-आळंदी भागातील कत्तलखान्याचे आरक्षण मुख्यमंत्र्यांनी आधीच रद्द केले आहे. देवस्थानांच्या जमिनींवरील आरक्षणे रद्द केली पाहिजेत. गोरगरिबांची घरे, विशेषतः अर्धा गुंठा आणि एक गुंठ्यांवरील घरे बाधित होता कामा नयेत. भूमिपुत्र भूमिहीन होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.

चऱ्होली येथील २५ एकरांवर असलेल्या गार्डनच्या आरक्षणात कपात करावी आणि स्थानिक ग्रामस्थांचे श्रद्धास्थान असलेल्या देवस्थानांवरील प्रस्तावित आरक्षणे रद्द करावीत, अशीही मागणी करण्यात आली.

तसेच, ब्लू लाईन आणि रेड झोनमधील आरक्षणे विकसित करताना शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा यासाठी युडीसीपीआरच्या नियमांमध्ये सुधारणा करावी, अशीही मागणी आमदार लांडगे यांनी केली. पिंपरी-चिंचवडकरांनी सादर केलेल्या प्रत्येक हरकती-सूचनांवर निष्पक्षपणे कार्यवाही व्हावी आणि आराखडा अंतिम करण्यात यावा, असे ते म्हणाले.

उद्योगमंत्री उदय सामंत यांनी उत्तर देताना सांगितले की, एमआरटीपी अधिनियम १९६६ च्या कलम २२ अंतर्गत आरक्षणे प्रस्तावित केली जातात. डीपी प्रक्रियेनंतर हरकती व सूचनांचा विचार होतो आणि नंतरच आराखडा शासनाच्या मंजुरीसाठी पाठवला जातो.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा उपाध्यक्षांच्या घरावर दरोडा

**नारायणगाव, ता. ०८ :** आळेफाटा येथील राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष अनंत चौगुले यांच्या घरावर ८ ते १० जणांच्या सशस्त्र दरोडेखोरांनी रविवारी (ता. ०६) रात्री दरोडा टाकून १२ लाखांचा ऐवज चोरल्याची घटना समोर आली आहे.





दरोडेखोरांनी सुरुवातीला वडगाव आनंद (ता. जुन्नर) येथील चौगुले मळ्यात राहत असलेल्या रमेश चौगुले यांच्या घराच्या मागील बाजूचा दरवाजा तोडून कपाटातील सोन्याचे दागिने आणि रोख ८० हजार रुपये लंपास केले. त्यानंतर याच मळ्यात राहणाऱ्या शरद पवार यांच्या पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष अनंत चौगुले यांच्या बंगल्याचा मागील दरवाजा तोडून बंगल्यात प्रवेश केला. सहा ते सात तोळे सोन्याचे दागिने, साडेतीन किलो चांदीच्या वस्तू आणि दीड लाख रुपयांची रोख रक्कम असा १२ लाखांचा ऐवज चोरला.

याबाबत आळेफाटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विश्वास जाधव यांनी सांगितले की, सीसीटीव्ही फुटेजमध्ये एकूण १० आरोपी असल्याचे दिसून आले आहेत. या चोरीचा तपास सुरू आहे. येत्या दोन दिवसांत आरोपी निष्पन्न होतील.

# स्वारगेट पोलीस वसाहतीत पोलीस शिपायाची आत्महत्या

**पुणे, ता. ०८ :** स्वारगेट पोलीस वसाहतीत एका पोलीस शिपायाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सोमवारी दुपारी घडली. आत्महत्येमागचे निश्चित कारण समजू शकले नाही. स्वरुप विष्णू जाधव (वय-२९, रा. स्वारगेट पोलीस वसाहत) असे आत्महत्या केलेल्या पोलीस शिपायाचे नाव आहे. या प्रकरणी खडक पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्वरुप जाधव हे पोलीस शिपाई म्हणून पोलीस मुख्यालय या ठिकाणी कार्यरत होते. जाधव हे मूळचे कोल्हापूरचे राहणारे आहेत. सध्या ते स्वारगेट येथील पोलीस लाईन मध्ये वास्तव्यास होते. सोमवारी दुपारी त्यांनी राहत्या घरातील हॉलमधील खिडकीच्या अँगलला टॉवेलने गळफास लावून आत्महत्या केली आहे. त्यांनी हे टोकाचं पाऊस का उचललं याचे कारण अद्याप समोर आले नाही. याचा तपास पोलीस करत आहेत.

पोलिसांना घटनास्थळी कुठलीही सुसाईड नोट किंवा आत्महत्या का केली? याच कारण मिळू शकलेलं नाही. मात्र, पोलिसांनी स्वरुप जाधव यांचा मोबाईल ताब्यात घेतला असून, मोबाईलमध्ये काही पुरावे सापडतात का? याचा शोध घेत आहेत. एका पोलिस कर्मचाऱ्याने अशाप्रकारे जीवन संपवल्याने पुणे पोलिस दलात खळबळ उडाली आहे.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून अशा घटनांमध्ये वाढ होत असून, सध्या चिंतेचे वातावरण आहे. जाधव यांनी एवढं टोकाचं पाऊल उचलण्यामागे काय कारण असेल? याचा पोलीस तापस घेत असून, लवकरच कारण स्पष्ट होईल. जाधव यांनी अचानक घेतलेल्या या टोकाच्या निर्णयामुळे त्यांच्या कुटुंबियांमध्ये शोककळा पसरली आहे.

# नसरापूर ग्रामपंचाय कार्यालयाची प्रहार संघटनेच्या कार्यकर्त्याकडून तोडफोड

**विशाल शिंदे**

नसरापूर, ता. ०८ : भोर तालुक्यातील नसरापूर ग्रामपंचायतीत ग्रामसेवक विजय कुलकर्णी यांचा शोध घेत आलेल्या एका व्यक्तीने गोंधळ घालून महिला कर्मचाऱ्यांना प्रश्नांचा भडिमार केला. टेबलाची काच फोडून कार्यालयात तोडफोड केली आणि मी प्रहार संघटनेचा माणूस आहे, काहीही करू शकतो अशी धमकी दिल्याचा प्रकार घडला आहे.

या प्रकरणी राजगड पोलीस स्टेशनमध्ये आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शनिवारी (ता. ०७) दुपारी आरोपी हनुमंत मंगेश शिंदे (रा. देगाव नायगाव, ता. भोर) ग्रामपंचायतीत आला. त्यावेळी दोन महिला कर्मचारी कार्यालयात हजर होत्या. आरोपीने मोठ्याने विचारले, तुमचे



ग्रामसेवक विजय कुलकर्णी कुठे आहेत? त्यावर महिलांनी सांगितले की, ते काही कारणास्तव ससेवाडी येथे गेले आहेत.

यावर संतप्त झालेल्या आरोपीने महिला कर्मचाऱ्यांना विचारले, नसरापूरमध्ये रावसाहेब (ग्रामसेवक) कधी असतात? ते काय काम करतात? असे प्रश्न करत त्यांना अडचणीत टाकले. यानंतर रागाच्या भरात आरोपीने ग्रामसेवकाच्या टेबलावरील काच उचलून जमिनीवर आपटून फोडली व थोडीशी तोडफोड केली. दरम्यान, यावेळी कर्मचारी रुपेश रवींद्र ओहाळ यांनी शांत राहण्याचे आवाहन केले असता, आरोपीने मोठ्याने ओरडत शिवीगाळ केली व म्हणाला, मी प्रहार संघटनेचा माणूस आहे, काहीही करू शकतो, हे लक्षात ठेवा. तुम्हाला काम करून देणार नाही. या प्रकारामुळे ग्रामपंचायतीत काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, पुढील तपास राजगड पोलीस करत आहेत.

# राज्यात रिक्त पदांसाठी लवकरच मेगा भरती; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई, ता. ०८ :** राज्य शासनाने सर्व विभागांना १५० दिवसांचा उद्दिष्टांचा कार्यक्रम दिला आहे. या कार्यक्रमांतर्गत आकृतीबंध, नियुक्ती नियम (रिक्रुटमेंट रूल) सुधारित करणे, अनुकंपा तत्वावरील भरती १०० टक्के करणे, आदी उद्दिष्टे दिली आहेत. या उद्दिष्टपूर्तीनंतर रिक्त पदांची निश्चित माहिती समोर आल्यावर या रिक्त पदांसाठी राज्य शासन मेगा भरतीकरेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले.

अनुसूचित जमाती प्रवर्गातील रिक्त पदांच्या भरतीबाबत सदस्य भीमराव केराम यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या चर्चेदरम्यान सदस्य डॉ. नितीन राऊत, नाना पटोले, भास्कर जाधव, सुरेश धस यांनीही उपप्रश्न उपस्थित केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मागील काळात शासनाने ७५ हजार पदभरतीचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार एक लाखांपेक्षा जास्त पदांची भरती करण्यात आली. शासन पदभरतीबाबत कुठेही मागे पुढे पाहणार नाही. राज्यात अनुसूचित जमाती प्रवर्गातील ६ हजार ८६० पदांवर जात वैधता प्रमाणपत्र सादर न करू शकलेले कार्यरत आहे. मात्र त्यांना २० वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. अशा पदांबाबत शासनाने मानवतापूर्ण दृष्टीने विचार करीत ही पदे अधिसंख्य केली. या पदांवर कार्यरत असलेल्यांना बढती मिळणार नाही. पण शासन त्यांना पदावरून कमीही करणार नाही. त्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर ही पदे व्यपगत होतील. अनुसूचित जमाती प्रवर्गातील बिंदूनामावलीनुसार एकही राखीव पद रिक्त ठेवण्यात येणार नाही.



अधिसंख्य असलेली ६ हजार ८६० पदे अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी भरती करण्याकरिता रिक्त झालेली आहे. त्यापैकी १३४३ अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव असलेल्या पदांवर भरती केलेली आहे. उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी ब्लॉक चेन पद्धतीवर अभिलेख आणण्याबाबत शासन प्रयत्न करीत आहे. त्यामुळे जात प्रमाणपत्र पडताळणी करताना कागदपत्रे तपासणे सोयीचे होईल. तसेच जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना सक्षम करण्यात येत आहे. अधिक वेगाने आणि पारदर्शकपणे वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत सचिवांचा गट तयार करण्यात येईल. या गटाच्या माध्यमातून अभ्यास करून कार्यवाही करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने सफाई कामगारांची पदे वारसा हक्काने भरण्याबाबत असलेली स्थगिती उठवलेली आहे. लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार ही पदे वारसा हक्काने भरण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील अनुसूचित जमाती प्रवर्गासाठीच्या पदांसाठीही भरतीही करण्यात येणार आहे.

# कुंजीरवाडी येथे किरकोळ कारणावरून एकाच्या पोटात खुपसली कात्री

**लोणी काळभोर, ता. ८ :** 'तु मला शिव्या नको देवूस' असे म्हणाल्याने एकाच्या पोटात कात्री खुपसल्याची घटना घडली आहे. ही घटना कुंजीरवाडी (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील हॉटेल ७७ च्या पाठमागे रविवारी (ता. ६) सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या घटनेत एक जण जखमी झाला आहे तर एकावर लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अजित दमोदर कुंजीर (वय-३६, मु. पो. कुंजीरवाडी ग्रामपंचायतच्या पाठीमागे, ता. हवेली, जि-पुणे) असे जखमी झालेल्याचे नाव असून त्याच्यावर कुंजीरवाडी परिसरातील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. तर मारुती गलांडे (रा- मु.पो. कुंजीरवाडी ता. हवेली, जि-पुणे) असे गुन्हा दाखल




झालेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अजित कुंजीर हे नेहमीप्रमाणे रविवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास शेताकडे चालले होते. शेतीकडे जाणाऱ्या सामाईक रस्त्याने जात असताना, मारुती गलांडे व त्याचे मित्र गप्पा मारत बसले होते. त्या सर्वांना पाहुन फिर्यादी हे त्यांच्या जवळ गेले होते. तेव्हा मारुती गलांडे हा हा फिर्यादी अजित कुंजीरला पाहून म्हणाला, तु सारखा सारखा इकडुन का येत आहेस, तुझ्या मुळे माझे हॉटेल बंद पडले. माझे एवढे मोठे नुकसान झाले असे म्हणाला.

'तु मला शिव्या नको देवूस' असे फिर्यादी कुंजीर म्हणाल्याचा राग मनात धरून मारुती गलांडे याने गुलाबाचे रोप कट करण्याची कात्री कुंजीर यांच्या पोटात खुपसली. तसेच कुंजीर यांना विटेनी मारहाण केली. या मारहाणीत कुंजीर यांच्या पोटातून रक्तस्त्राव होऊ लागला. त्यानंतर तेथील मित्रांनी कुंजीर यांना उपचारासाठी कुंजीरवाडी येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असून कुंजीर यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती तेथील डॉक्टरांकडून मिळत आहे.

दरम्यान, या प्रकरणी अजित कुंजीर यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार मारुती गलांडे याच्या विरोधात भारतीय न्यास संहिता २०२३ चे कलम ११८ (१), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक रुपाली जाधव करीत आहेत.